

# देशाचे पहिले कृषिमंत्री , संविधान सभेचे सदस्य, सत्यशोधक डॉ. पंजाबराव (भाऊसाहेब) देशमुख यांचा विजय असो!

प्रिय बहीण-भावांनो,

शिक्षित समाज, जातीविरहित समाज व्यवस्था व मागासलेल्या समाजाच्या विकासाचे स्वप्न उराशी बाळगून संपूर्ण आयुष्य बहुजन समाजाच्या विकासासाठी झिजविणाऱ्या डॉ. भाऊसाहेब उर्फ पंजाबराव देशमुख यांनी शिक्षण व कृषी क्षेत्रात अतुलनीय कार्य केले. यासोबतचं भारतीय संविधानात तळागाळातील लोकांच्या विकासासाठीच्या उपाय योजना आणण्यासोबत सत्यशोधकी, सर्वधर्मसमभाव, पुरोगामी विचार रुजवण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न अतुलनीय होते. भारतीय संविधान निर्मितीच्या काळात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या डॉ. भाऊसाहेब उर्फ पंजाबराव देशमुख यांना जयंती निमित्त विनम्र अभिवादन!

भाऊसाहेबांचा जन्म अमरावती जिल्ह्यामध्ये पापळ या गावी 27 डिसेंबर 1898 रोजी झाला. भारत त्यावेळी पारतंत्र्यात होता. इंग्रजांच्या लुटीच्या धोरणामुळे शेती उध्वस्त झालेली होती. अशिक्षित व आत्यंतिक गरिबीत असलेला समाज, नामशेष झालेले रोजगार-उद्योग-बाजारपेठ, शिक्षण-आरोग्यासारख्या मूलभूत सुविधांची वानवा अशी एकंदर परिस्थिती होती. यात गोरगरीब शेतकऱ्यांची सावकारशाही प्रचंड लूबाडणूक करत होती. एकीकडे अशी परिस्थिती असताना समाजामध्ये प्रचंड जातीय विषमता होती. महिलांची परिस्थिती दयनीय होती. कर्मकांडानी समाज वेढलेला होता. तिथेही या समाजाचे शोषण होत होते. अश्या अत्यंत विषम परिस्थितीमध्ये वकिलीमध्ये उच्च शिक्षण घेऊन इंग्लंड वरून परत आल्यानंतर भाऊसाहेबांनी समाजासाठी स्वत:ला झोकून दिले. समाजाच्या विकासासाठी आयुष्यभर लढा दिला, विविध शोषणांतून मुक्तता केली, संस्थात्मक उभारणी करत सन्मानाने जगण्याच्या मार्ग मोकळा करून दिला.

## क्रांतीवीर भाऊसाहेब

- विदेशी सत्तेविरोधात भाषणे, सभा, प्रचार यांच्या माध्यमातून लोकांमध्ये स्वातंत्र्याची जाणीव निर्माण केली. **खेड्यापाड्यांत खादीचा प्रचार केला व महात्मा गांधींचा ग्रामोद्योगाचा कार्यक्रम राबविला.**
- **भाऊसाहेबांनी आझाद हिंद सेनेचा दिल्लीमध्ये खटला चालविला, क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या वऱ्हाड येथील दौऱ्याचे आयोजन** इ. पध्दतीने जनतेला अन्याय सहन न करता संघटित होण्याचे आवाहन केले.
- दुसऱ्या महायुध्दात इंग्रजांना मदत करण्याबाबत काही समाजघटकांनी भूमिका घेतल्यावर नाशिक मध्ये उपस्थित संस्थानिक,प्रस्थापित लोकांना सुनावत ते म्हणतात, **"इंग्रजांचे युध्दात मदत करून आपल्या गुलामगिरीची मुदत वाढविण्यापेक्षा व इंग्लंडचे स्वातंत्र्य रक्षणाकरिता आपले प्राण खर्ची घालण्यापेक्षा आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपले प्राण का देऊ नयेत?"**

## शेतकऱ्यांचे कैवारी भाऊसाहेब

- **शेतकरी संघ, भारत कृषक समाज, भारत सेवक समाज याद्वारे** शेतकऱ्यांना संघटित करत अन्यायाविरोधात लढण्याची प्रेरणा दिली.
- **1933 चा कर्ज लवाद कायदा:** लाखो कर्जबाजारी शेतकऱ्यांची जमीन याद्वारे वाचली. सहकारी बँक व 'कापूस बाजार' द्वारे शेतकऱ्यांची दलांलाच्या एकाधिकारशाहीतून मुक्तता केली. शेतकऱ्यांसाठी पंधरा कलमी कार्यक्रम.
- देशाचे पहिले कृषिमंत्री असताना 'जपानी पध्दतीने भातशेती' प्रयोग करत कमी भातबियाणे वापरत अधिक उत्पादनाचा विक्रम केल्यामुळे तांदूळ उत्पादनाच्या तंत्राचे एक तज्ञ म्हणून जगभर ओळख, आंतराष्ट्रीय धान्य मंडळ व इतर अनेक संस्थांची स्थापना करत शेतकऱ्यांना स्वाभिमानाने जगण्याचा अधिकार मिळवून दिला.
- संविधानसभेमध्ये संपत्ती करावरील विधेयकावर बोलताना ते म्हणतात, **"शेतकऱ्याला आपल्या कुटुंबाच्या सर्वसाधारण गरजादेखील भागवता येत नाही. उलट ज्यांची संख्या संपूर्ण देशात दोन हजारांपेक्षाही कमी आहे अश्यांकडे देशातील 75% पेक्षा जास्त संपत्ती आहे. ही अफाट संपत्ती या मूठभर लोकांचा हातात राहू न देता देशाच्या विकासाकरिता उपयोगात आणावी."**






## शिक्षणमहर्षी भाऊसाहेब

- जिल्हा कौन्सिलचे अध्यक्ष असताना विरोध पत्करत कर आकारणीत वाढ करून 11 वर्षाखालील मुलामुलींना मोफत 'सक्तीचे शिक्षण' केले. यातून खेड्यापाड्यांमध्ये शाळा उघडण्यात आल्या.
- प्राथमिक शाळांवर स्त्री-शिक्षिका नेमण्याचा उपक्रम, फिरती वाचलानये अश्या योजना राबवित खेड्यापाड्यांमध्ये शिक्षणाचे महत्व पटवून दिले.
- 1932 साली श्री शिवाजी एज्युकेशन सोसायटीची स्थापना करत राजर्षी शाहू महाराज यांनी संस्थेला भरीव मदत केली.
- 1950 मध्ये श्री शिवाजी लोकविद्यापीठाची स्थापना, 1956 मध्ये रूरल इन्स्टिट्यूटची स्थापना अश्या अनेक संस्थांची उभारणी करत बहुजन समाजाला शिक्षणाच्या प्रवाहात आणले.

# महिला मुक्तीसाठी झटणारे भाऊसाहेब




**"स्त्री ही स्वतंत्र असली पाहिजे"** - डॉ. भाऊसाहेब उर्फ पंजाबराव देशमुख

- भाऊसाहेबांचे महिलांसाठी केलेले कार्य:
  - महिलांच्या शिक्षणासाठी विशेष प्रयत्न - मुलींची शाळा
  - महाविद्यालयांमध्ये महिला प्राध्यापकांची नेमणूक करण्याची सुरूवात
  - विधवा, अनाथ स्त्रियांसाठी वसतीगृहाची स्थापना
  - भाऊसाहेबांच्या पत्नी विमलाबाई देशमुख विदर्भातील पहिल्या महिला कायद्याच्या पदवीधर

# जातीयतेच्या विरोधातील भाऊसाहेब

**"जातीयतेची कीड नष्ट करायची असेल तर शिक्षणाच्या सोयी, सवलती सर्वांना लागू करणे आवश्यक आहे "** - भाऊसाहेब

- वयाच्या 29 व्या वर्षी 1927 मध्ये अंबादेवी अस्पृश्यांसाठी मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह
  - **अस्पृश्यांसाठी पाणवठ्याची योजना,** विहीरी खुल्या
  - **सर्व जाति-धर्मातील विद्यार्थ्यांसाठी एकत्र वसतिगृह**
  - आयुष्यभर जातियतेविरोधात लढा
  - त्या काळामध्ये **आंतरजातीय विवाह**
  - भाऊसाहेबाचा पहिला खटला हा सत्यशोधक जलसाबद्दल होता.

# डॉ. भाऊसाहेब देशमुख आणि भारतीय संविधान

आपल्या देशातील भक्ती परंपरेतील अनेक महान संतांची, शिव-फुले-शाहू-आंबेडकर यांचे विचार आणि महात्मा गांधी, स्वातंत्र्य सैनिकांची स्वप्ने आपल्या संविधानात आहे. संविधान सभेमध्ये भाऊसाहेबांनी अत्यंत महत्वपूर्ण योगदान दिले. त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल डॉ बाबासाहेब आंबेडकर गौरवोद्गार काढतात,
"पददलित जातींव्यतिरिक्त भारतात आणखीही काही अत्यंत दुलर्क्षित, असहाय अशा जाती आहेत याची जाणीव घटना समितीतील बहुसंख्य सभासदांना डॉ. पंजाबराव देशमुख यांच्यामुळे झाली व म्हणून त्यांच्या प्रगतीसाठी भारतीय संविधानात काही तरतुदी करता आल्या."



संविधान सभेतील शेवटच्या भाषणामध्ये भाऊसाहेब म्हणतात की प्रौढ मताधिकाराने देशामध्ये आमूलाग्र बदल होणे आवश्यक आहे. यासोबतचं ज्यांचे समाजात वर्चस्व आहेत (जात,वर्ग, लिंग इ. आधारित) असे स्वार्थी मनुष्य वर्चस्व टिकवू शकले नाही तरच संविधान यशस्वीपणे लागू होईल. भाऊसाहेबांचे देशाचे स्वप्न हे भारतीय संविधानामध्ये समाविष्ट आहे. यामुळेचं

**चला, डॉ. भाऊसाहेब देशमुख यांना अभिवादन करत संविधानाचा प्रचार करूयात!**

---




## जयंतीनिमित्त खालील उपक्रम आपण करावेत हा आमचा आग्रह!

1. जयंतीदिवशी भाऊसाहेबांसाठी 'एक दिवा शिक्षणाचा' लावावा.
2. आपल्या भागामध्ये घरोघरी जात भाऊसाहेबांच्या विचारांचा प्रचार व प्रसार करावा. हा आपल्या सर्वांसाठी आनदांचा दिवस असल्याने साखर वाटावी. हे पत्रक सुध्दा लोकांना द्यावे.
3. परिसरातील सर्व मुले विशेषत: मुली शिक्षण घेत आहेत ना याची खातरजमा करावीत.


**संविधान जागर अभियान**

**निमंत्रक समिती: मा.न्या.बी.जी. कोळसे पाटील, मा.न्या.ए.एम. ठिपसे, मा.न्या. टी.व्ही. नलावडे, तुषार गांधी, डॉ. राम पुनियानी, डॉ. नितीन राऊत, धनाजी गुरव, नीरज जैन**

samvidhan.jagar

स्वप्निल फुसे: 79723 45764 | नागार्जुन वाडेकर: 98602 39899 | राजाभाऊ करवाडे: 98222 02739

samvidhanjagar.org